# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१६-१७

## प्रसिध्दी निवेदन

दि.०७.१०.२०१६.

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता पूर्ण झालेली आहे. पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयां मधील कला, वाणिज्य व विज्ञान शाखांमधील एकुण प्रवेश क्षमता त्यामध्ये झालेले प्रवेश व रिक्त जागांची माहिती खालील प्रमाणे .

| अ. क्र. | कनिष्ठ महाविद्यालये संख्या | शाखा निहाय संख्या (कला,वाणिज्य,विज्ञान) | एकूण प्रवेश क्षमता | झालेले प्रवेश | रिक्त जागा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | २४५ | ५८६ | ७९६६५ | ६४०२३ | १५६४२ |

अंतिम फेरी नंतर रिक्त जागांचा तपशिल पुढील प्रमाणे :-

| अ.क्र. | शाखा | माध्यम | रिक्त जागांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | कला | मराठी | २३०२ |
| | | इंग्रजी | २८४८ |
| २ | वाणिज्य | मराठी | ११०६ |
| | | इंग्रजी | ३०९० |
| ३ | विज्ञान | इंग्रजी | ६२९६ |
| | | एकुण | १५६४२ |

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशानुसार व शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ दि. २८.०३.२०१६ च्या शासन निर्णयानुसार इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१६-१७ करिता यशस्वीरित्या पुर्ण करण्यात आलेली आहे. प्रवेश प्रक्रियेचे कामकाज पारदर्शक पध्दतीने केलेले असून १०० टक्के प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्यात आलेले आहेत.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थी, पालक, नागरिक, विविध संघटना, शिक्षण क्षेत्रातील तज्ञ, प्राचार्य, मुख्याध्यापक, संगणक तज्ञ, शिक्षक संघटना आणि शासनाचे अधिकारी व कर्मचारी, व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी, सेवानिवृत्त प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक यांनी प्रवेश प्रक्रिया चांगल्या पध्दतीने राबविल्याबाबत उत्कृष्ट प्रतिक्रिया दिलेल्या आहेत. तसेच सर्व पत्रकार, प्रिन्ट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया, सर्व स्वयंसेवी संस्था यांनी इ.११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया यशस्वी होण्यासाठी सहकार्य केलेले आहे त्याबद्दल सर्वांचे मनापासून आभार.

त्यामुळे इ. ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१६-१७ पूर्ण झाल्याचे इ. ११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीच्या वतीने जाहीर करण्यात येत आहे.

सदरचे प्रसिध्दीपत्रक इ. ११वी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या http://pune.fyjc.org.in या संकेतस्थळावर व शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे या कार्यालयाच्या www.dydepune.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(दिनकर टेमकर)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१